वर्ष : ०५ | अंक: २२ | मुंबई, मंगळवार २३ एप्रिल २०१९ ते २९ एप्रिल २०१९ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021


WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 जेटनंतर आता एअर इंडियाही संकटात ?

3 → राजकारणाचा घसरता स्तर

दुसऱ्या टप्प्यात देशभरात ६६ टक्के मतदान ← 4




## जोपर्यंत मी आहे तोपर्यंत...

# कोणताच पंजा तुम्हाला हात लावू शकणार नाही



**जोपर्यंत मोदी सरकार आहे तोपर्यंत कोणताही 'पंजा' तुम्हाला हात लावू शकणार नाही, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नंदुरबारमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादीला टोला लगावला. मोदी म्हणाले, काँग्रेस-राष्ट्रवादी हे दोन्ही घोटाळेबाज पक्ष आहेत. नंदुरबारमधूनच त्यांनी आधार कार्ड योजनेची सुरूवात केली होती. मात्र, आता ही योजना जेव्हा मी राबवू पहातोय तेव्हा काँग्रेसचे लोक आधार कार्ड योजना बंद करण्यासाठी सुप्रीम कोर्टाचे दरवाजे ठोठावत आहेत.**

आदिवासी बांधवांसाठी पेन्शन योजना सुरू करणार अशीही घोषणा यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केली. मी सत्तेवर आहे तोपर्यंत आदिवासींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, असे मोदी यावेळी म्हणाले. काँग्रेस आणि इतर पक्ष तुमची थट्टा करीत आहेत. मध्यप्रदेशात आदिवासी विकास योजनांसाठी पाठवलेला निधीही या पक्षांनी खाल्ला. कुपोषणाची समस्या आपल्याला समूळ नष्ट करायची आहे. मात्र, काँग्रेसवाल्यांची नियत साफ नाही म्हणूनच त्यांचं राज्य असलेल्या मध्य प्रदेशातही ते या पैशांमध्येही भ्रष्टाचार करीत आहेत, अशा शब्दांत त्यांनी काँग्रेसवर सडकून टीका केली. या निवडणुकीनंतर देशाला एका मजबूत सरकारची गरज आहे. काँग्रेसने आजवर शेतकऱ्यांना आणि आदिवासी बांधवांना लुटून खाल्लं आणि आता कर्जमाफी देण्याची गोष्ट करीत आहेत. काँग्रेस नेत्यांनी कायमच शेतकरी आणि आदिवासी बांधवांचा अपमान केला आहे. मात्र, आम्ही शेतकऱ्याला प्रतिष्ठा कशी प्राप्त होईल, आदिवासी बांधवांना सन्मानाने कसं जगता येईल यासाठी प्रयत्न करतो आहोत, असंही मोदी यावेळी म्हणाले.

महायुतीच्या उमेदवार हीना गावित यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नंदुरबारमध्ये सभा घेतली. नवभारत योजनेच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना पक्की घरं देणं, त्यांच्या घरी गॅस पोहचणं, त्यांचा सन्मान करणं ही आमची त्रिसूत्री आहे, असे मोदी यावेळी म्हणाले.

### 'भारताकडील अणुबॉम्ब दिवाळीसाठी राखून ठेवलेला नाही'

पाकिस्तान नेहमी भारताला अणुबॉम्बची धमकी देतो. परंतु भारत आता त्यांच्या धमक्यांना घाबरत नाही. आमच्याकडे असणारा अणुबॉम्ब आम्ही काही दिवाळीसाठी ठेवलेला नाही अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकिस्तानला इशारा दिला आहे. राजस्थानमधील बाडमेरमध्ये भाजपने एका प्रचारसभेचे आयोजन केले होते. मोदी एका प्रचारसभेत बोलत होते. मोदी यावेळी म्हणाले की, भारताने पाकिस्तानच्या धमक्यांना घाबरणे आता सोडून दिले आहे. नाहीतर पूर्वी दररोज आमच्याकडे न्युक्लिअर बटन आहे, या गोष्टीचा पाकिस्तानकडून पुनरुच्चार होत होता. माध्यमं त्यावेळी हेडलाईन लिहायची की, पाकिस्तानकडे अणुबॉम्ब आहे. तर मग आमच्याकडे असलेला अणुबॉम्ब आम्ही दिवाळीसाठी ठेवला आहे का? असा सवालही मोदींनी यावेळी उपस्थित केला.

## ८ स्फोटांनी श्रीलंका हादरला

# २०० लोक ठार




**कोलंबोः श्रीलंकेची राजधानी कोलंबोमध्ये आज ईस्टर संडे साजरा होत असताना शहरातील चर्च आणि फाइव्ह स्टार हॉटेलांमध्ये साखळी बॉम्बस्फोट घडवण्यात आले. प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, आतापर्यंत २०० जणांचा मृत्यू झाला असून, ४०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. यात ३५ विदेशी पर्यटकांचा समावेशही आहे. दरम्यान, सकाळी ६ स्फोट झाल्यानंतर सुमारे ५ तासांनंतर आणखी दोन स्फोट घडवण्यात आल्याची माहिती कोलंबो पोलिसांनी दिली. यात २ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. याप्रकरणी आतापर्यंत ७ जणांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान, या साखळी स्फोटांनंतर भारतातही हाय अलर्ट जारी करणता आला आहे. श्रीलंका सरकारने श्रीलंकेत संचारबंदीचे आदेश दिले आहेत.**

या साखळी स्फोटानंतर श्रीलंका सरकारने फेसबुक, ट्विटर असे सोशल मीडिया काही काळासाठी बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे रॉयटर्स इंडिया या वृत्तसंस्थेने दिले आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, येथील चर्च आणि फाइव्ह स्टार हॉटेलांमध्ये एकूण ८ बॉम्बस्फोट झाले. यात २०० ठार झाले असून, ४००हून अधिक नागरिक जखमी झाले आहेत. बट्टीकलोआ येथील चर्चमध्ये बॉम्बस्फोट झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. कोलंबोतील दोन फाइव्ह स्टार हॉटेलांतही बॉम्बस्फोट झाले. एका वेबसाइटनं दिलेल्या वृत्तानुसार, कोच्छिकाडे आणि काटुवापिटिया येथील चर्चमध्ये स्फोट झाले आहेत. आतापर्यंत ४०० हून अधिक नागरिक जखमी झाले आहेत. यात विदेशी पर्यटकांचाही समावेश आहे. दरम्यान, कोणत्याही दहशतवादी संघटनेनं अद्याप या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली नाही.

भारताच्या परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी कोलंबोतील बॉम्बस्फोटांच्या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. कोलंबोतील भारतीय उच्चायुक्तांच्या संपर्कात आहोत. तेथील परिस्थितीचा आढावा घेतला जात आहे, असं त्या म्हणाल्या.

### स्फोटांत तीन भारतीयांचा मृत्यू

श्रीलंकेत झालेल्या आठ साखळी बॉम्बस्फोटांमध्ये तीन भारतीयांचा मृत्यू झाला आहे. लोकेशीनी, नारायण चंद्रशेखर आणि रमेश अशी या तिघा भारतीयांची नावं असल्याची माहिती परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी दिली आहे. श्रीलंकेच्या कोलंबो शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी आज दिवसभरात ८ बॉम्बस्फोट झाले. त्यात २०७हून अधिक लोक ठार झाले असून ४५० लोक जखमी झाले आहेत. या स्फोटात तीन भारतीयांचा मृत्यू झाला असून याबाबतची अधिक माहिती घेण्यात येत असल्याचं सुषमा स्वराज यांनी ट्विटद्वारे म्हटलं आहे. काश्मीरमधील भारतीय उच्चायुक्तांनी दिलेल्या माहितीनुसार श्रीलंकेतील बॉम्बस्फोटात लोकेशीनी, नारायण चंद्रशेखर आणि रमेश या तीन भारतीयांचा मृत्यू झाला आहे. याबाबतची अधिक माहिती मिळवली जात आहे, असं स्वराज यांनी म्हटलं आहे. श्रीलंकेच्या स्फोटात २०७ लोक ठार झाल्याची माहिती श्रीलंकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

# मुंबईतही राज गर्जना

- राज ठाकरेंची तोफ मुंबईत धडाडणार
- अखेर सभेला अखेर परवानगी

भाजपबरोबरच शिवसेनेवरही हल्ला चढवण्याची शक्यता



***मुंबई: – केंद्र आणि राज्यातील भाजपच्या सरकारची पोलखोल करणारे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची तोफ मुंबईतही धडाडणार आहे. त्यांच्या सभेला अखेर परवानगी देण्यात आली आहे. २३ एप्रिल रोजी काळाचौकी येथे राज यांची जाहीर सभा होणार आहे. त्यामुळे राज मुंबईत कुणाकुणाचे वस्त्रहरण करतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.***

राज ठाकरे यांच्या सभेसाठी मनसेने मुंबई महापालिका आणि निवडणूक आयोगाकडे सभेची परवानगी मागितली होती. मात्र महापालिकेने या सभेची परवानगी नाकारली होती. त्याचे तीव्र पडसाद उमटल्यानंतर आज निवडणूक आयोग आणि महापालिकेने राज यांच्या सभेला परवानगी दिली आहे. मनसेने २४ एप्रिल रोजी सभेची परवानगी मागितली होती. मात्र त्यांना २४ एप्रिल ऐवजी एक दिवस आधी २३ एप्रिलची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे २३ एप्रिल रोजी राज यांची सभा काळाचौकी येथील शहीद भगतसिंग मैदानात ही सभा होणार आहे.

निवडणूक विषयक सर्व प्रकारच्या सभा, प्रचारसभांसाठीच्या रितसर परवानग्या जिल्हाधिकारी कार्यालयातील एक खिडकी योजना अंतर्गत दिल्या जातात. त्यामध्ये सर्वच पक्ष, अपक्षांचा समावेश असतो. नियमानुसार या परवानग्या दिल्या जातात. त्यात कोठेही पक्षपातीपणा केला जात नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने देखील सभेची परवानगी मागितली होती. त्यांनाही आज नियमाप्रमाणे परवानगी देण्यात आली आहे. तसेच अन्य पक्षाचेही अर्ज आले असून त्याचाही नियमानुसार विचार केला जात आहे. या बाबत होत असलेल्या अपप्रचाराबाबत खुलासा करण्यात येत आहे, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं.

राज यांनी पुणे, सातारा, महाड, नांदेड, सोलापूर, इचलकरंजी आदी ठिकाणी सभा घेऊन केंद्र आणि राज्य सरकारची पोलखोल केली होती. त्यामुळे मुंबईतल्या सभेत राज भाजपबरोबरच शिवसेनेवरही हल्ला चढवण्याची शक्यता राजकीय जाणकारांकडून वर्तवण्यात येत आहे.

## तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा थंडावल्या

नवी दिल्ली: लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा आज थंडावल्या. तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रासह देशभरातील १६ राज्यातील ११८ लोकसभा मतदारसंघात येत्या २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्यात महाराष्ट्रातील १४ जागांचा समावेश असून अनेक मतदारसंघात चुरशीची लढत होणार असल्याने त्याकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे.



तिसऱ्या टप्प्यातील निवडणूक प्रचारासाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोर लावला होता. काँग्रेस, राष्ट्रवादी, बसपा, सपा, भाजप, शिवसेना, माकप आणि वंचित बहुजन आघाडीसह विविध पक्षांच्या उमेदवारांनी बाईक रॅलीसह भेटीगाठी आणि सभांवर जोर दिला होता. आज रविवारचा दिवस असल्याने सर्वच उमेदवारांनी रोड शोवर भर देऊन प्रचाराचा धुरळा उडवून दिला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी, काँग्रेस महासचिव प्रियांका गांधी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर, एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवैसी, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आदी नेत्यांनी त्यांच्या भाषणातून एकमेकांवर टीका करत मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला होता. तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या शेवटच्या दिवशी मोदींनी तीन सभा घेतल्या, अमित शहा यांनी एक रोड शो केला. तर काँग्रेसनेही तीन सभा घेतल्या. दुसऱ्या टप्प्यात निवडणूक आयोगाने तामिळनाडूतील वेल्लोर आणि त्रिपूरा पश्चिम लोकसभा मतदारसंघातील निवडणूक रद्द केली होती. त्या ठिकाणीही तिसऱ्या टप्प्यात मतदान होणार असल्याने १६ राज्यांतील ११८ लोकसभा मतदारसंघात २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्याचबरोबर गुजरातमधील सर्वच्या सर्व २६ लोकसभा मतदारसंघातही मतदान होणार आहे.

## महिला पत्रकारांबाबत भाजप नेत्याचे आक्षेपार्ह वक्तव्य

### टीके नंतर 'ती' पोस्ट काढली

**तामिळनाडू - भाजपाचे नेते एस. व्ही. शेखर यांनी महिला पत्रकारांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. महिला पत्रकाराला काम विळवायचे असेल तर त्या सेक्स करण्यासही सहज तयार होतात. एवढेच काय शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याशिवाय वृत्तनिवेदकही होऊ शकत नाहीत. अशा आशयाची पोस्ट त्यांनी फेसबुकवर केली आहे.**

तामिळनाडूचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांनी पत्रकार परिषदेत महिला पत्रकाराच्या गालाला हात लावला होता. त्यावेळी त्यांच्या त्या कृतीमुळे वाद निर्माण झाला होता. त्यानंतर पुरोहित यांनी त्या महिला पत्रकाराची माफी मागितली. मात्र हेच प्रकरण शांत झाले नाही



त्यातच भाजपा नेते एस. व्ही. शेखर यांनी बनवारीलाल पुरोहित यांच्या समर्थनात महिला पत्रकाराला काम विळवायचे असेल तर त्या सेक्स करण्यासही सहज तयार होतात. मीडिया हाऊसेसमधील कोणत्याही मोठ्या पदावरच्या व्यक्तीसोबत शय्यासोबत केल्याशिवाय महिला पत्रकार मोठ्या पदावर पोहचू शकत नाहीत. एवढेच काय त्या शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याशिवाय वृत्तनिवेदकही होऊ शकत नाहीत. अशा आशयाची पोस्ट त्यांनी फेसबुक वर केली आहे.

इतकेच नव्हे तर, तामिळनाडूतील प्रसारमाध्यमांमध्ये काम करणारे लोक तुच्छ, हीन आणि नीच दर्जाचे आहेत. हाताच्या बोटावर मोजण्या इतकीच काही चांगली माणसे आहेत. त्यांचा मी आदर करतो. याचबरोबर, तामिळनाडूतील प्रसारमाध्यमे फक्त ब्लॅकमेलिंग करणाऱ्या आरोपींच्या हातात आहे असेही त्यांनी त्या फेसबुक पोस्ट मध्ये म्हणले आहे.

विशेष म्हणजे, भाजपाचे नेते एस. व्ही. शेखर यांच्या त्या पोस्टमुळे गदारोळ माजला आहे. सर्व महिला पत्रकार शेखर यांचा निषेध करण्यासाठी भाजपा मुख्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच तामिळनाडूच्या पत्रकारांनी शेखर यांच्याविरोधात तक्रारही केली आहे.

दरम्यान, भाजपाचे नेते एस. व्ही. शेखर यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. मला तसे म्हणायचे नव्हते . थिरुमलाइ यांची पोस्ट मी शेअर केली त्याआधी वाचली नाही. असे त्यांनी म्हंटले. त्यानंतर फेसबुक वर करण्यात आलेली ती पोस्ट डिलीट करण्यात आली आहे. विशेष म्हणजे थिरुमलाइ हे अमेरिकेतील भाजपाचे समर्थक आहेत.

# जेटनंतर आता एअर इंडियाही संकटात?



**मुंबई-** आर्थिक संकटात सापडलेल्या जेट एअरवेजने आपली सर्व उड्डाणे रद्द केल्यानंतर आता आर्थिक संकटाचे काळे ढग राष्ट्रीय विमान कंपनी एअर इंडियाकडे झेपावू लागले आहेत. एअर इंडियावर एकूण २९,००० कोटी कर्ज आहे व त्यापैकी ९००० कोटी कर्जाची परतफेड कंपनीला मार्च २०२० पूर्वी करायची आहे; परंतु एअर इंडियाजवळ सध्या एवढी मोठी रक्कम उभी करण्याची क्षमता नाही.

त्यामुळेच कंपनीने मदतीसाठी वित्त मंत्रालयाला साकडे घातले आहे. गळेकापू स्पर्धेमुळे व अनावश्यक नोकर भरती झाल्यामुळे एअर इंडियाला सतत तोटा होत आहे.

याचबरोबर बालाकोटवरील एअर स्ट्राईकनंतर पाकिस्तानने भारतीय विमानांना पाकिस्तानवरून उडण्यास मनाई केली आहे. त्यामुळे एअर इंडियाच्या आंतरराष्ट्रीय फेऱ्यांना पाकिस्तानी हवाई क्षेत्र टाळून जाण्यासाठी लांबचा फेरा पडतो आहे. या एकाच कारणामुळे एअर इंडियाला दररोज सहा कोटी तोटा होतो आहे.

# तापदायक दिवस; कडक उन्हामुळे मुंबईकर त्रस्त

**मुंबई-** अवेळी पडलेल्या पावसामुळे मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील कमाल तापमानात काही अंशी घट नोंदविण्यात येत असतानाच दुसरीकडे मात्र मुंबईकर कडक उन्हामुळे त्रस्त झाले आहेत.

मागील तीन दिवसांपासून मुंबई शहर आणि उपनगरावर दाटून आलेले मळभ शुक्रवारी निवळले. परिणामी, मोकळ्या झालेल्या आकाशातून थेट पडलेल्या सूर्यकिरणांमुळे मुंबईकरांना कडक उन्हास सामोरे जावे लागले. शुक्रवारी मुंबईचे कमाल तापमान ३४ अंश होते. तरी ऊन, उकाड्याने मुंबईकरांसाठी दिवस तापदायक ठरला. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार, गेल्या २४ तासांत मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली. मध्य महाराष्ट्राच्या काही भागात कमाल तापमानात लक्षणीय घट झाली. विदर्भाच्या काही भागात कमाल तापमानात किंचित घट झाली. दरम्यान, शनिवारसह रविवारी मुंबई, आसपासच्या परिसरातील आकाश मुख्यत: निरभ्र राहील. कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे ३६, २४ अंशाच्या आसपास राहील.



# मुंबई शहरातील अजून एक माफिया

**मुंबई-** मुंबईला त्रास देणारे आजवर अनेक माफिया झाले. त्यांनी या मायानगरीला पोखरून काढले. भूमाफिया, तेल माफिया, डिझेल माफिया, वाळू माफिया, ही यादी मोठी आहे. या यादीत अजून एका माफियाचा समावेश झाला आहे. तो म्हणजे बांधकाम माफिया. स्वातंत्र्यानंतर रोजगाराच्या शोधात मुंबईत येणा-यांना राहण्यासाठी जागा देणारा म्हणून हा माफिया जन्माला आला. गेल्या सहा दशकात या माफियाने मुंबईला विद्रुप करून टाकले. जागा मिळेल तेथे अनधिकृत बांधकाम, झोपडपट्टी, चाळी, अशी अनेक अवैध बांधकामे या माफियाने उभी केली. भ्रष्ट प्रशासकीय अधिकारी, राजकीय नेते यांच्या पाठबळामुळे हे शक्य झाले. आता हे माफिया डोईजड झाल आहेत. त्यांच्याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या आहेत. त्याची दखल घेत अनधिकृत बांधकामे पाडण्याचे आदेश न्यायालयाने दिले. अवैध बांधकामे नियमित करू नका, असेही न्यायालाने बजावले. मात्र निगरगट भ्रष्ट अधिकारी व राजकीय नेत्यांना ते मान्य होणारे नाही.



अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचे धोरण सरकारने आणले. ते न्यायालयाने फेटाळून लावले. त्यानंतर पुन्हा सरकारने नवीन धोरण आणले. तेही न्यायालयाने फेटाळले व अवैध बांधकामे नियमित करू नका, असे सरकारला सांगितले. सरकार काही ऐकले नाही, त्यांनी पुन्हा नवे धोरण तयार केले. हे धोरण सध्या न्यायालयाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. याप्रकरणांच्या याचिकांवर सुनावणीत न्यायालय प्रत्येकवेळी सरकारला फटकारते. नुकत्याच झालेल्या सुनावणीत न्यायालयाने पुन्हा एकदा सरकारचे कान टोचले. शाळेचे बांधकामच अवैध असेल तर तेथे विद्यार्थी काय धडे घेणार, असे खडेबोल न्यायालयाने सुनावले. आपल्याकडे मंदीर, मशीदचे बांधकामही अनधिकृतपणे केलेले असते. अशा बांधकामात देव राहतोच कसा?, मला देव भेटला तर त्याला मी हा प्रश्न नक्की विचारेन, असेही न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाला असे म्हणण्याची वेळ आज आली. न्यायालयाच्या टिप्पणीनंतर तरी भ्रष्ट अधिकारी व राजकीय नेत्यांनी थोडे सुधारायला हवे. अनधिकृत बांधकामे रोखणे अशक्य नाही.

अनधिकृत बांधकाम नियमित न करण्याची भूमिकाही प्रशासन घेऊ शकते. कॅम्पा कोलाचे प्रकरण यासाठी उत्तम उदाहरण ठरेल. कॅम्पा कोलाचे रहिवाशी सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले. त्यावरील सुनावणीत केंद्र व राज्यातील सरकार बदलले तरी या इमारतींचे बांधकात अद्याप नियमित झालेले नाही. नवी मुंबईतील दिघा परिसरातील बांधकाम नियमित करण्यास तेथील प्रशासन तयार नाही. येथील रहिवाश्यांची याचिका उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. या दोन ठिकाणचे बांधकाम नियमित करण्यास प्रशासन तयार नसेल तर संपूर्ण राज्यातील अनधिकृत बांधकामालाही विरोध केला जाऊ शकतो. प्रत्येक स्थानिक प्रशासनाने अशी कठोर भूमिका घ्यायला हवी. तरच या बांधकाम माफियांना आळा बसेल, अन्यथा अनधिकृत बांधकामे वाढतच राहितील. त्यांची चढ्या भावाने विक्री होईल व कालांतराने ती नियमतही होतील.

# डिसेंबर २०२१मध्ये देशातील पहिली भुयारी मेट्रो धावणार

**मुंबई- सुमारे १८ हजार कोटी रुपये खर्चाच्या आणि ३३.५ किमी लांबीच्या देशातील पहिल्याच अशा कुलाबा- सिप्झ भुयारी मेट्रोचा २४ किलोमीटर लांबीचा मार्ग पूर्ण झाला असून डिसेंबर २०२१ मध्ये वांद्रे- कुर्ला संकुल (बीकेसी) ते आरे वसाहतदरम्यान पहिली मेट्रो धावू लागेल, अशी माहिती 'मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन'च्या (एमएमआरसी) वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. विधानसभा निवडणुकांपूर्वी राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्प दृष्टिपथात याव्यात, यासाठी या प्रकल्पांच्या कामांना गती देण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत.**

त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागासह, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन, राज्य रस्ते विकास महामंडळ आणि सिडको या पायाभूत सुविधा निर्मिती करणाऱ्या सध्या कामाला लावण्यात आले आहे. नागपूरप्रमाणेच मुंबई, नवी मुंबईतील मेट्रो प्रकल्प निवडणुकीपूर्वी कार्यान्वित व्हावेत, किमान दृष्टिपथात तरी यावेत यासाठी संबंधित यंत्रणांना कामाला लागल्या असून कामाचे वेग वाढविण्याचे आदेश ठेकेदारांना देण्यात आले आहेत. मुंबईकरांच्या दृष्टीने दिसालादायक ठरणारा सर्वात महत्त्वाचा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुलाबा- सिप्झ भुयारी मेट्रो मार्गाचे काम सध्या जोरात सुरू आहे. ३३.५ किमी लांबीच्या मेट्रो मार्गात दोन मार्गिका असून आतापर्यंत सुमारे ४५ टक्के म्हणजेच २४.५ किलोमीटर लांबीच्या भुयाराचे काम पूर्ण झाले आहे. त्यामध्ये कफ परेड ते हुतात्मा चौकदरम्यान दोन किमी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते ग्रँट रोड दरम्यानच्या सात किमीपैकी साडेचार किमी लांबीच्या भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. तसेच सिद्धिविनायक मंदिर दादर ते शितळादेवी मंदिर माहीम दरम्यान १०किमी पैकी ६ किलोमीटर, धारावी ते सांताक्रूझ दरम्यानच्या ७ किमी पैकी ४ किलो मीटर लांबीच्या मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. संपूर्ण मार्गाचे काम साधारणपणे मे २०२२ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा असल्याचे एमएमआरसीच्या अधिकाऱ्याने सांगितले. या मार्गावर एकूण २६ भूमिगत स्थानक असून त्यांचीही कामे प्रगतिपथावर आहेत. या २६पैकी १२ स्थानकांमध्ये खोदकाम पूर्ण झाले असून स्थानक उभारणीचे काम सुरू आहे. तर १२ स्थानकांमध्ये अद्यापही खोदकाम प्रगतिपथावर आहे. पुढील दोन महिन्यांत तेथेही स्थानक उभारणीचे काम सुरू होईल. मात्र गिरगाव आणि काळबादेवी येथे जागा उशिरा उपलब्ध झाल्याने तिथे सध्या पायलिंगची कामे चालू असल्याची माहितीही या अधिकाऱ्याने दिली.

या प्रकल्पातील पहिल्या टप्प्याच्या आरे वसाहत ते बीकेसी दरम्यानच्या १२ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गाचे काम युद्धपातळीवर सुरू असून डिसेंबर २०२१पर्यंत हा टप्पा प्रवासी वाहतुकीसाठी खुला केला जाईल. तर बीकेसी ते कफ परेड दरम्यानच्या २१ किमी लांबीच्या दुसऱ्या टप्प्याचे काम मे २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तथापि, अजूनही आरेमध्ये कारडेपोसाठी झाडे तोडण्याची परवानगी वृक्षप्राधिकरणाकडून मिळालेली नसल्याने काम लांबू शकते, असेही या अधिकाऱ्याने सांगितले.



# यंदा शाळेची घंटा १७ जूनला

**मुंबई-** येत्या शैक्षणिक वर्षांसाठीच्या सुट्ट्यांसंदर्भातील परिपत्रक शिक्षण संचालनालयाने १८ एप्रिल रोजी जाहीर केले आहे. त्यानुसार येत्या शैक्षणिक वर्षासाठी विदर्भाव्यतिरिक्त राज्यातील शाळा १७ जूनपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विदर्भातील शाळा उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर २६ जूनपासून सुरू होतील. शाळांना दिवाळीची सुट्टी २१ ऑक्टोबरपासून देण्यात यावी, असे शिक्षण संचालक गंगाधर म्हमाणे यांनी जाहीर केलेल्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

ठरवण्यात येईल. शाळांना उन्हाळी अथवा दिवाळी या दीर्घ सुट्यांमधून काही सुट्टी गणपती व नाताळसाठी देता येणार आहे. मात्र शाळा संहितेच्या नियमानुसार सर्व प्रकारच्या एकूण सुट्ट्या या ७६ दिवसांपेक्षा जास्त होणार नाहीत; तसेच एकूण कामाचे दिवस २३० इतके होतील याची काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच शासकीय स्तरावरून जाहीर झालेल्या सर्वच सार्वजनिक सुट्या शाळा, ज्युनिअर कॉलेजांनी घेणे बंधनकारक असल्याचेही परित्रकात नमूद आहे. माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना



माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयामार्फत दरवर्षी शैक्षणिक वर्षात सुट्टयांची निश्चिती केली जाते. त्यानुसार संचालनालयाने गुरुवारी सुट्यांचे परिपत्रक जारी केले. १ मे रोजी महाराष्ट्र दिन साजरा केल्यानंतर शिक्षणाधिकाऱ्यांनी नियोजन करून उन्हाळ्याच्या सुट्या लागू करण्याच्या सूचना द्याव्यात, असे नमूद केले आहे. गणेशोत्सव वा नाताळची सुट्टी शिक्षणाधिकाऱ्यांच्या परवानगीने सुट्यांच्या निश्चितीबाबत संबंधित मुख्याध्यापक आणि संघटनांची बैठक घेऊन सुट्या निश्चित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सुट्यांचे वेळापत्रक तयार करताना जून ते मे अखेर असे शैक्षणिक वर्ष विचारात घ्यावे, अशाही सूचना दिल्या आहेत. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सुट्टयांबाबत प्रयोगशाळा साहाय्यक आणि परिचर वगळता इतर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दीर्घ सुट्टया लागू असणार नसल्याचे म्हटले आहे.

# उत्तर पश्चिम मुंबईत करणार नोटांचा विक्रम?

**मुंबई-** २०१४ च्या लोकसभा निवडणुकांपासून नोटा अमलात आले. यंदा उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे उमेदवार संजय निरुपम हे मनसेचे कट्टर शत्रू आहेत. तर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नरेंद्र मोदी व शहामुक्त भारत असा विडा उचलला आहे. त्यामुळे मनसे निरुपम व कीर्तिकर यांना मतदान करण्याचा प्रश्नच नसून येथील मनसैनिक नोटा मतदान करतील, असा सूर मनसेच्या सूत्रांनी बोलताना व्यक्त केला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातून ११ हजार ९ इतके नोटा मतदान झाले होते.

उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघात एकूण २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. येथून महायुतीचे गजानन कीर्तिकर व काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे संजय निरुपम यांच्यात मुख्य लढत होणार आहे. २००९ व २०१४ साली येथून लोकसभा निवडणूक लढवणारी




महाराष्ट्र नवनिर्माण सेना यंदा राज्यात कुठेही लोकसभा निवडणूक लढवत नाही. मात्र मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपला पाठिंबा राज्यात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला जाहीर केला आहे. राज्यात त्यांच्या विक्रमी सभा होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांच्यावर ते टीकेचे आसूढ ओढत आहेत. राज्यात मनसेने काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला पाठिंबा दिला असला तरी उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील आघाडीचे उमेदवार संजय निरुपम हे मनसेचे कट्टर शत्रू आहेत.

मनसेला आघाडीत समाविष्ट करण्यास निरुपम यांनी कडाडून विरोध केला होता. मनसे आणि निरुपम यांचे विळ्या-भोपळ्याचे नाते सर्वश्रुत आहे. त्यामुळे या निवडणुकीत मनसेचा एकही कार्यकर्ता त्याचे काम करणार नाहीत, अशी ठाम भूमिका मनसेचे सरचिटणीस बाळा नांदगावकर यांनी नुकतीच जाहीर केली होती.

# बेकायदा बांधकामांमध्ये देव राहतो तरी कसा?

**मुंबई-** हा देश मोठा विचित्र आहे. येथे कुणीही बेकायदा मंदिरे बांधू शकतात, मशिदी बांधू शकतात. सार्वजनिक ठिकाणी ही बांधकामे केली जातात आणि कायद्याकडून ती नियमित करण्याची मुभाही आहे. मात्र अशा बांधकामांमध्ये देव राहतो तरी कसा, असा प्रश्न उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंदराजोग यांनी गुरुवारी उपस्थित करीत राज्यातील अनधिकृत बांधकामांवर तिरकस टिप्पणी केली.

जर मला देव भेटला किंवा माझ्यापुढे तो उभा राहिला तर मी त्याला, हे सगळे तुला चालते तरी कसे, अशा बेकायदा बांधकामांमध्ये तू राहतोस तरी कसा, असे जरूर विचारणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बेकायदा बांधकामांवरील दुसऱ्या एका याचिकेवरील सुनावणीच्या वेळीही त्यांनी या मुद्द्यावर कठोर भूमिका घेतली. ते म्हणाले की, मुंबईसह राज्यात बांधकामांबाबत कायदा-नियम सर्रासपणे पायदळी तुडवले जात आहेत. प्रत्येक



इमारतीत काही ना काही समस्या आहेत. हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्या गुंड लोकांनी नागरिकांना वेठीस धरले आहे. विकासकांच्या टोळ्यांचे येथे वर्चस्व आहे. प्रशासनही त्यांच्या हाती असल्याचे दिसते. एकूण काय तर मुंबईसह राज्यात कायद्याचे राज्यच अस्तित्वात नाही. जर १० गुंड त्रास देत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्तांना दिले जाऊ शकतात. मात्र विकासकांकडून मोठ्या संख्येने गैरप्रकार केले जात असतील, तर काय करायचे, याबाबत त्यांनी उद्विग्नता व्यक्त केली. तसेच हे थांबवण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची गरज मांडली. पुण्यातील बेकायदा महाविद्यालय आणि नवी मुंबईतील भोगवटा प्रमाणपत्राशिवाय उभ्या असलेल्या इमारतींशी संबंधित याचिकांवरील सुनावणीच्या वेळी मुख्य न्यायमूर्ती नंदराजोग यांनी जनहित याचिकांच्या माध्यमांतून पुढे आलेल्या मुंबईसह राज्यातील समस्या आणि स्थितीबाबत भाष्य केले.

# ई-सिगारेट, हुक्का विक्रीवर कारवाई

**मुंबई-** ई-सिगारेटच्या वापरामुळे तरुणपिढीचे जीवन धोक्यात आहे. या पिढीतील मुला-मुलींना ई-सिगारेट असो वा हुक्का अगदी सहज उपलब्ध होतो. त्यामुळे ई-सिगारेटवर बंदी आणण्याविषयी विविध स्तरांवरून मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य विभागाने सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना याबाबत सूचना दिल्या आहेत. राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासनानेही ई-सिगारेट विकणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. देशभरात 'ई-सिगारेटी'ची विक्री, उत्पादन, आयात आणि व्यापारावर केंद्र सरकारने बंदी घातली आहे. तरीही मुंबईसह अनेक भागांत छुप्या पद्धतीने ई-सिगारेट आणि हुक्का पार्लरचा व्यवसाय केला जातो. त्यामुळेच, यावर निर्बंध घालण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाने राज्यातील सर्व विभागीय औषध अधिकाऱ्यांना लेखी पत्र पाठवून 'ई-सिगारेट' विक्री होत असल्याचे आढळून आल्यास तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या सिगारेटमध्ये निकोटीनचा वापर केल्यामुळे आरोग्यावर वाईट परिणाम होतो. कर्नाटक, जम्मू-काश्मीर, केरळ आणि हरियाणा या राज्यांनी याआधीच ई-सिगारेटवर




बंदी घातली आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त डॉ. पल्लवी दराडे यांनी सांगितले की, ई-सिगारेटमुळे तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात आहे. त्यामुळेच केंद्र आणि आरोग्य विभागाने ई-सिगारेटवर बंदी आणली आहे. त्यानुसार आता राज्य शासनाच्या सहकार्याने कारवाईसाठी कठोर पावले उचलली जातील.

# सागरी किनारा मार्गाचे काम रोखले; न्यायालयाचा सरकार-पालिकेला धक्का

मुंबई- प्रस्तावित सागरी किनारा मार्ग प्रकल्पासाठी समुद्रात भराव टाकण्याचे काम तूर्त करू नये असे बजावूनही ते सुरूच ठेवल्याबाबत उच्च न्यायालयाने मंगळवारी नाराजी व्यक्त केली. एवढेच नव्हे, तर प्रकल्पासाठी समुद्रात टाकण्यात येणाऱ्या भरावाच्या कामासह सागरी किनारा मार्गाचे बांधकाम थांबवावे आणि परिस्थिती 'जैसे थे' ठेवावी, असे आदेश देत न्यायालयाने राज्य सरकार आणि मुंबई महापालिकेला धक्का दिला.

याबाबतची कारणमीमांसा करणारा आदेश गुरुवारी दिला जाईल, असेही न्यायालयाने या वेळी स्पष्ट केले. या प्रकल्पाच्या कामामुळे सागरी किनाऱ्यालगत झालेले पर्यावरणीय नुकसान झाले तेवढे पुरे झाले, यापुढे ते केले जाऊ नये, याचा पुनरुच्चार न्यायालयाने या वेळी केला. त्याचवेळी प्रकल्पाबाबत जाहीर सूचना का काढली नाही, या प्रकल्पाला कशाच्या आधारे अपवादात्मक म्हणणार, अपवादात्मक असल्याचे मानले तरी, अत्यावश्यक पर्यावरणीय परवानग्या न घेताच भराव टाकण्याचे काम कसे सुरू केले, अशा प्रश्नांची सरबत्ती करत मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंदराजोग आणि न्या. नितीन जामदार यांच्या खंडपीठाने केली.

प्रकल्पासाठी टाकण्यात येणाऱ्या भरावामुळे सागरी किनाऱ्याचे आणि सागरी जैवविविधतेचे जेवढे नुकसान व्हायचे तेवढे झाले आहे.



# सुक्या कचऱ्याच्या विल्हेवाटीतून कचरावेचकांच्या उन्नतीचा मार्ग

**मुंबई-** रस्त्यावर मिळणारा सुका कचरा गोळा करायचा आणि तो विकून मिळालेल्या पैशातून नशा करायची आणि दिवस ढकलायचा असे आयुष्य जगणाऱ्या कचरावेचकांना मुंबई महापालिकेच्या एका प्रकल्पाने प्रगतीचा नवा मार्गच खुला करून दिला आहे. पालिकेच्या 'एच' पश्चिम विभाग कार्यालयाने वांद्रे परिसरात सुक्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी एक अभिनव प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पात सुक्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात आहेच; पण कचरावेचक कामगारांचे पुनर्वसनही करण्यात आले आहे.

मुंबईतील कचराभूमींची क्षमता कधीचीच संपली आहे. त्यामुळे कचऱ्याची विल्हेवाट कशी लावायची, यासाठी पालिकेकडून वेगवेगळे पर्याय शोधले जात आहेत. त्याचप्रमाणे कचराभूमीवर जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठीही पालिका प्रशासन विविध उपाय राबवत आहे. मोठ्या गृहसंकुलांनी ओला कचरा आपल्या आवारात जिरवणे पालिकेने बंधनकारक केले असले तरी, तेथून गोळा होणाऱ्या सुक्या कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न कायम आहे. या पार्श्वभूमीवर वांद्रे येथील 'एच' पश्चिम विभाग कार्यालयाने राबवलेला प्रकल्प मुंबईच नव्हे तर अन्य महापालिकांसाठीही पथदर्शी ठरणार आहे.

# संपादकीय...

## मतदार याद्यांमधील घोळ अन् निवडणूक आयोगाची जबाबदारी


संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

विदर्भातील अकोला, अमरावती आणि बुलडाणा या तीन मतदारसंघांसह, राज्यातील एकूण दहा आणि देशातील एकूण ९५ मतदारसंघांमध्ये गुरुवारी लोकसभा निवडणुकीचे दुसऱ्या टप्प्याचे मतदान पार पडले. मतदार याद्यांमधील प्रचंड घोळ हे दुसऱ्या टप्प्यातील मतदानाचे वैशिष्ट्य ठरले. जवळपास प्रत्येकच मतदारसंघात मतदार याद्यांमध्ये घोळ असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात झाल्या. अनेक मतदारांकडे मतदार ओळखपत्र असूनही मतदार यादीत मात्र त्यांचे नावच नव्हते! त्याशिवाय नाव एकाचे, तर छायाचित्र दुसऱ्याचेच, घरातील एका व्यक्तीचे मतदान एका केंद्रात, तर दुसऱ्या व्यक्तीचे मतदान तेथून काही किलोमीटर अंतरावरील दुसऱ्याच मतदान केंद्रात, असेही अनेक प्रकार उघडकीस आले. मतदार यादीतून नावे गहाळ झाल्याचे प्रकार तुरळक असावेत, मतदारांची नोंदणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या चुकीमुळे किंवा हलगर्जीमुळे तसे घडले असावे, असेच कुणालाही वाटेल; मात्र तेलंगणाची राजधानी येथून आलेली एक बातमी अत्यंत धक्कादायक आहे. विशिष्ट राजकीय पक्षाला निवडणुकीत लाभ व्हावा यासाठी तेलंगणा, आंध्र प्रदेश व पंजाबमधील काही कोटी मतदारांची नावे मतदार याद्यांमधून गहाळ करण्यात आल्याचे त्या बातमीत म्हटले आहे. त्यासाठी त्या मतदारांच्या आधार कार्डचा 'डेटा' चोरण्यात आला आणि त्याचा वापर करून त्यांची नावे याद्यांमधून बाद करण्यात आली, अशी माहितीही बातमीत देण्यात आली आहे. हा प्रकार अत्यंत धक्कादायक आहे. जर तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि पंजाबमधील मतदार याद्यांमध्ये अशा रितीने गडबड केली जाऊ शकते, तर इतर राज्यांमध्येही तसे झाले असण्याची शक्यता आहेच ना? नावे गहाळ असण्याच्या महाराष्ट्रात झालेल्या तक्रारी खरेच तुरळक होत्या, की महाराष्ट्रातही जाणीवपूर्वक गडबड करण्यात आली? तंत्रज्ञान मानवी जीवन सुकर बनविण्यास मदत करते, यामध्ये अजिबात वाद नाही; मात्र त्याच तंत्रज्ञानाचा वापर संकुचित स्वार्थासाठीही होऊ शकतो, हे यापूर्वी अनेकदा सिद्ध झाले आहे. तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि पंजाबमधील मतदारांची नावे गहाळ करण्याचा प्रकार म्हणजे तंत्रज्ञानाच्या गैरवापराचेच उदाहरण आहे. हैदराबादस्थित एका आयटी कंपनीची सध्या चौकशी सुरू आहे. त्या अनुषंगाने ताब्यात घेण्यात आलेल्या संगणकांच्या हार्ड डिस्कमध्ये पंजाबमधील तब्बल दोन कोटी आधार कार्डांचा 'डेटा' आढळला आहे. यापूर्वी तेलंगणा व आंध्र प्रदेशमधील तब्बल ७ कोटी ८० लाख आधार कार्डांचा 'डेटा' आढळला होता. या प्रकरणाची चौकशी करीत असलेल्या विशेष तपास पथकाचे (एसआयटी) प्रमुख असलेले पोलीस महानिरीक्षक स्टीफन रवींद्र यांनी मतदार यादीतून नावे गहाळ झाल्याबद्दल आंध्र प्रदेश व तेलंगणातील एका प्रादेशिक पक्षावर संशय व्यक्त केला आहे. त्या पक्षाने कार्यकर्त्यांसाठी एक ॲप विकसित करवून घेतले आहे. त्या ॲपसाठी गोळा करण्यात आलेल्या मतदारांच्या माहितीचा वापर मतदार याद्यांमधून नावे गहाळ करण्यासाठी करण्यात आला असावा, असा कयास आहे. स्टीफन रवींद्र यांनी दिलेल्या माहितीनुसार, ॲपसाठी गोळा करण्यात आलेल्या मतदारांच्या माहितीचे विश्लेषण करून, ते मतदार संबंधित पक्षाला मतदान करण्याची कितपत शक्यता आहे, हे पडताळण्यात आले असावे. त्यासाठी 'आयव्हीआरएस' प्रणालीचा वापर करण्यात आला असावा. हल्ली सर्वच राजकीय पक्ष 'ऑटोमेटेड व्हॉइस कॉलिंग'साठी या प्रणालीचा वापर करतात. या प्रणालीचा वापर करून मतदारांना विविध प्रश्न विचारून त्यांचा कल जाणून घेण्यात आला असावा आणि ज्यांचा कल विरोधात असल्यासारखे वाटले असेल, त्यांची नावे मतदार याद्यांमधून गहाळ करण्यात आली असावी. त्यासाठी फॉर्म क्रमांक सातचा वापर करण्यात आला असावा, असा कयासही त्यांनी व्यक्त केला आहे. फॉर्म क्रमांक सात मतदार यादीतील एखाद्या नावावर आक्षेप घेण्यासाठी वापरण्यात येतो. या सुविधेचा वापर कुणीही करू शकतो. हा फॉर्म भरल्यानंतर निवडणूक आयोग पडताळणी करतो. ज्या व्यक्तीच्या नावावर आक्षेप घेण्यात आला आहे, ती व्यक्ती दिलेल्या पत्त्यावर राहते अथवा नाही, त्या व्यक्तीचे निधन झाले आहे का, त्या व्यक्तीचे नाव मतदार यादीमध्ये एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंदविण्यात आले आहे का, इत्यादी बाबींची पडताळणी करण्यात येते आणि त्यामध्ये तथ्य आढळल्यास, आक्षेप घेण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव मतदार यादीमधून बाद करण्यात येते. सध्या तरी हे सर्व एसआयटीचे कयास आहेत. ती वस्तुस्थिती आहे का, हे यथावकाश तपासादरम्यान पुढे येईलच. ज्या राजकीय पक्षाकडे संशयाची सुई वळली आहे, त्या पक्षाने अर्थातच सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आधार कार्डांचा 'डेटा' चोरीला गेल्याचा आरोप 'युनिक आयडेंटिफिकेशन ऑथरिटी ऑफ इंडिया'ने फेटाळून लावला आहे. संशयाची सुई वळलेल्या राजकीय पक्षाने त्याचा आधार घेतला आहे. शिवाय फॉर्म सातनुसार नोंदविण्यात आलेल्या आक्षेपांची निवडणूक आयोगाकडून पडताळणी करण्यात येत असल्याचे स्मरण करवून देत, फॉर्म सहा भरून संबंधित मतदार आपले नाव पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करवून घेऊ शकतो, याकडेही त्या पक्षाने लक्ष वेधले आहे. त्यामध्ये तथ्य असले तरी अनेक मतदारांची नावे यादीतून गहाळ झाली आहेत, ही वस्तुस्थिती शिल्लक उरतेच! शिवाय निवडणुकीचे निकाल प्रभावित करण्यासाठी माहिती-तंत्रज्ञानाचा गैरवापर होतो, ही बाब आता जागतिक पातळीवर सिद्ध झाली आहे. त्यामुळे तसा तो भारतात होतच नसेल, याची खात्री कशी द्यावी? स्वायत्त निवडणूक आयोग हे भारताचे एक वैशिष्ट्य आहे. जगातील अनेक लोकशाहीप्रधान देशांमध्ये अशी यंत्रणा अस्तित्वात नाही. निष्पक्ष वातावरणात निवडणुकी पार पाडणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. जर माहिती-तंत्रज्ञानाचा वापर करून निवडणूक निकाल प्रभावित करण्याचा प्रयत्न होत असेल, तर लोकशाहीच्या मूळ तत्त्वालाच नख लागते. निवडणूक आयोगाने ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन, मतदार याद्यांमधील घोळांची सखोल चौकशी करणे आणि घोळ निस्तारणे अभिप्रेत आहे.

# राजकारणाचा घसरता स्तर

**कधी एखादी मंत्री विरोधी पक्षाच्या नेत्याच्या प्रकृतीची वास्तपुस्त करण्यासाठी अनपेक्षितपणे रुग्णालयात पोहचते, तर कधी प्रचारासाठी निघालेले दोन उमेदवार अचानक अमोरासमोर येतात अन् राजकीय विरोध बाजूला सारून अल्पोपहार, चहा घेत गप्पा मारतात! असे क्षण वाऱ्याच्या सुखद झुळकीसारखे सुखावून जातात; पण हल्लीच्या राजकारणात ते खूप दुर्मीळ झाले आहेत. राजकीय विरोधक म्हणजे जणू काही शत्रू असल्यासारखे हल्लीचे राजकीय नेते वागू लागले आहेत. साधनशुचिता हा शब्द तर राजकारणातून केव्हाच हद्दपार झाला होता; पण निवडणुकीत प्रचार करताना भाषेचा दर्जा सांभाळण्याचीही गरज अलीकडे राजकीय नेत्यांना वाटेनाशी झाली आहे. मतदाराला राजा संबोधल्या जाते; पण हल्ली मतदार नावापुरताच राजा उरला आहे. सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीत तर उमेदवार चक्क मतदारांना धमकवित असल्याचे प्रकार घडत आहेत.**




एखाद्या नवख्या उमेदवाराने असे प्रकार केल्यास एकदाची त्याकडे डोळेझाक करता येईलही; पण अनेक वर्षांपासून संसदेत प्रतिनिधीत्व करीत असलेले, जबाबदारीची पदे भुषविलेले ज्येष्ठ नेतेही मतांसाठी लोकशाही मूल्यांना खुंटीवर टांगून ठेवत अश्लाघ्य वक्तव्ये करतात, तेव्हा लोकशाहीचे काय होईल, हा प्रश्न कोणत्याही सुज्ञ नागरिकाच्या मनात डोकावल्याशिवाय राहत नाही. केंद्रीय मंत्री मनेका गांधी भूतदयेसाठी ओळखल्या जातात. कोणत्याही मुक्या प्राण्याला थोडा जरी त्रास झाला तरी त्यांना अतीव दु:ख होते; मात्र आपल्याला मतदान न केल्यास कामे घेऊन याल तेव्हा लक्षात ठेवेल, असा धमकीवजा इशारा मुस्लिम मतदारांना देताना त्यांना काहीच वाटत नाही! त्यामुळे झालेल्या टीकेनंतर त्यांनी पक्षाच्या सोशल मीडिया सेलवर खापर फोडले; पण स्वत: काही धडा घेतल्याचे दिसले नाही. त्यानंतर काही दिवसातच त्यांनी 'एबीसीडी फॉम्युला' आणला. या 'फॉर्म्युला'नुसार, मतदारसंघातील सर्व गावांची मनेका गांधींना मिळालेल्या मतांनुसार 'ए', 'बी', 'सी' आणि 'डी' अशी वर्गवारी करण्यात येईल आणि संबंधित गाव कोणत्या श्रेणीत मोडते हे बघून विकासकामे केल्या जातील! स्वत:ला पशू हक्क कार्यकर्ती, पर्यावरणवादी म्हणविणाऱ्या व्यक्तीने लोकशाही मूल्यांचा एवढा अनादर करावा?

भारतीय जनता पक्षाचेच सन्यासी खासदार साक्षी महाराज यांनी तर त्यांना मतदान न करणाऱ्या मतदारांना चक्क पाप लागेल, अशी धमकीच देऊन टाकली! ''एक सन्यासी तुमच्या दरवाजात आला आहे. सन्यासी तुमच्या दरवाजात येतो, तुम्हाला भिक्षा मागतो आणि जर त्याला भिक्षा मिळाली नाही तर तो कुटुंबवत्सल व्यक्तीचे पूण्य घेऊन जातो आणि आपले पाप त्या व्यक्तीला देऊन जातो,'' अशी मुक्ताफळे त्यांनी प्रचारादरम्यान उधळली. वरून हे आपले म्हणणे नाही, तर शास्त्रांमध्येच तसे नमूद केलेले आहे, हे सांगायलाही ते विसरले नाहीत. भाजपचेच गुजरातमधील आमदार रमेश कटारा यांनी तर मतदारांना धाक दाखविण्यासाठी नवीनच शक्कल लढवली. एका प्रचारसभेस संबोधित करताना ते म्हणाले, ''मतदान यंत्रावरील कमळाचे चिन्ह असलेली कळच दाबा. यावेळी मोदीसाहेबांनी मतदान केंद्रांमध्ये कॅमेरे बसविले आहेत. कुणी भाजपला मत दिले अन् कुणी कॉंग्रेसला मत दिले, हे त्यांना तिथे बसल्या बसल्याच दिसणार आहे.जर तुमच्या मतदान केंद्रात भाजपला कमी मते पडली तर तुम्हाला कमी कामे दिली जातील. मोदीसाहेबांना तिथे बसल्या बसल्याच हे कळेल, की तुम्ही काही तरी चुकीचे केले आहे. तुमच्या मतदार ओळखपत्रावर, आधारकार्डवर आणि शिधापत्रिकेवरही तुमचे छायाचित्र आहे, हे लक्षात ठेवा!''

मतदारांना अशा धमक्या देण्याचे काम केवळ भाजपचीच नेतेमंडळी करीत आहे असे नव्हे! कॉंग्रेसची मंडळीही त्यामध्ये मागे नाही. कॉंग्रेस सोडून इतर कोणत्याही उमेदवाराच्या नावापुढील कळ दाबल्यास विजेचा धक्का लागेल, अशी अफलातून धमकी छत्तीसगढमधील एका मंत्र्याने मतदारांना दिली आहे. ज्या मतदारसंघात मंत्री महोदय प्रचारासाठी गेले होते, त्या मतदारसंघात कॉंग्रेस उमेदवाराचे नाव मतदान यंत्रात प्रथम क्रमांकावर आहे. त्याचा लाभ घेत मंत्री महोदयांनी मतदारांना असे सागितले, की पहिल्या क्रमांकाची कळ दाबल्यास तुम्हाला काहीही होणार नाही; मात्र दुसऱ्या, तिसऱ्या किंवा अन्य कोणत्या क्रमांकाची कळ दाबल्यास तुम्हाला विजेचा जोरदार धक्का लागेल. आम्ही मतदान यंत्रांमध्ये तशी व्यवस्था केली आहे, असे हे मंत्री महोदय म्हणाले.

जगातील सर्वात मोठी लोकशाही असा भारताचा जगभर उल्लेख केला जातो. तमाम भारतीयांना त्याचा सार्थ अभिमानही आहे; मात्र स्वातंत्र्य, समता आणि न्याय या लोकशाही मूल्यांप्रती आम्ही प्रामाणिक आहोत का? क्षुद्र राजकीय स्वार्थासाठी मतदारांना धमकावण्यापर्यंत मजल गाठणाऱ्या नेत्यांना तरी त्या मूल्यांची चाड असल्यासारखे वाटत नाही. सरकारे येतील अन् जातील, नेते येतील अन् जातील; पण हा देश आणि देशाने स्वीकारलेली लोकशाही प्रणाली टिकली पाहिजे! त्यासाठी लोकशाहीच्या मूल्यांचे जतन कोणत्याही परिस्थितीत झालेच पाहिजे. राजकीय नेत्यांना ती समज नसेल तर सर्वसामान्य जनतेने ते उत्तरदायित्व निभावले पाहिजे आणि लोकशाहीचे सर्व लाभ उपटताना लोकशाही मूल्यांचाच अनादर करणाऱ्या तमाम नेत्यांना त्यांची लायकी अन् जागा दाखवून दिली पाहिजे!

# मतदान करा अन् एक दिवसाचा पगार मिळवा

**ठाणे :** ठाणे या सुशिक्षितांच्या शहरात प्रत्येक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी अत्यल्प असते. मतदान वाढवण्याकरिता या वेळी जिल्हाधिकारी कार्यालय, निवडणूक आयोगाने बरेच उपक्रम हाती घेतले असले, तरी 'मतदान करा आणि एक दिवसाचा पगार मिळवा', असा अभिनव उपक्रम ठाण्यातील सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ आणि पर्यावरणाचे अभ्यासक डॉ. महेश बेडेकर यांनी अमलात आणण्याचा निर्धार केला आहे. आपल्या रुग्णालयात ते हा उपक्रम राबवत असून जे कर्मचारी मतदान करतील, त्यांना डॉ. बेडेकर बक्षिसाच्या रूपात एक दिवसाचा पगार देणार आहेत.



वेगवेगळ्या डॉक्टर्स, वकील, उद्योजक, व्यापारी यांनीही आपल्याकडील कर्मचाऱ्यांना मतदानाकरिता उद्युक्त करण्याकरिता असे उपक्रम राबवावे, अशी अपेक्षा डॉ. बेडेकर यांनी व्यक्त केली. जास्तीतजास्त नागरिकांनी मतदान करणे, हे प्रबळ लोकशाहीकरिता आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मतदान करणे, हे आपले कर्तव्य आहे. सर्वांनी ते बजावलेच पाहिजे, असे सोशल मीडियापासून ते माउथ टू माउथ पब्लिसिटीद्वारे सांगितले जात आहे. तरुणांमध्येही याविषयी जागृती केली जात आहे. यासाठी ठाण्यासारख्या सांस्कृतिक नगरीत काही कट्ट्यांवर कार्यक्रम घेतले जात आहेत. परंतु २९ एप्रिल रोजी जेव्हा देशात व ठाण्यात चौथ्या टप्प्याचे मतदान होणार आहे, तेव्हा लागून सुटी येत असल्याने अनेक कुटुंबे पिकनिककरिता निघून जाण्याची दाट शक्यता आहे. आपण मतदान केले नाही, तर काय बिघडते? तसेही सर्वच पक्ष व राजकीय नेते चोर आहेत व त्यामुळे त्यांना कशाला मतदान करायचे, अशी मानसिकता ठाणे, मुंबईतील उच्च मध्यमवर्गीयांची गेल्या काही वर्षांत दिसून आली आहे. मात्र, मतदान न करता बाहेर फिरायला जाणारा हाच उच्च मध्यमवर्गीय अनेक समस्यांवरून सरकारवर व्हॉट्सॲप, फेसबुक किंवा टिष्ट्वटरवर तोंडसुख घेत असतो. अशा प्रवृत्तीच्या डोळ्यांत अंजन घालण्याकरिता डॉ. बेडेकर यांनी मात्र मतदानाविषयी जागृती करण्यासाठी हा फंडा वापरला आहे.

नागरिकांना मतदानाद्वारे पाच वर्षांतून आपले मत देण्याची संधी मिळते. मतदान हा लोकशाहीचा उत्सव आहे. लोकशाही आपल्याला खूप काही देते. परंतु, दुर्दैवाने याची किंमत लोकांना नाही. या उत्सवात जास्तीतजास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, म्हणून हा उपक्रम राबवला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. माझे नियंत्रण हे माझ्या रुग्णालयातील स्टाफवर आहे. त्यांना मतदान करण्याची सक्ती नाही, पण आवाहन करू शकतो. कुटुंबासह त्यांनी मतदान करावे, यासाठी जागृती करीत असल्याचे बेडेकर म्हणाले.

# नवीन ठाण्यासाठी क्लस्टर रखडवले

**ठाणे :** क्लस्टर योजना लागू होईल तेव्हा होईल, परंतु आजही ठाण्यात धोकादायक इमारतींचा प्रश्न तसाच प्रलंबित आहे. ठाणे महापालिकेने ४६७० इमारती धोकादायक असल्याचे जाहीर केले आहे. मागील वर्षी हा आकडा ४७०५ एवढा होता. यात मुंब्र्यात सर्वाधिक १४६० धोकादायक इमारती आहेत. मात्र, नवीन ठाणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खाडीपल्याड परिसरातील बिल्डरांच्या प्रकल्पांची चांदी व्हावी, चुनावी जुमला करता यावा, यासाठी क्लस्टरचे घोडे राज्यकर्त्यांनी रखडवल्याची चर्चा आहे.

पावसाळा सुरू झाला की, धोकादायक इमारतींचा प्रश्न हा नेहमीच चर्चेचा विषय ठरतो. पालिकेकडून जाहीर होणाऱ्या इमारतींच्या संख्येवरूनही अनेकवेळा शंका उपस्थित झाल्या आहेत. धोकादायक इमारतींमधील रहिवाशांना हक्काचे घर मिळावे, म्हणून ठाण्यात क्लस्टर योजना मंजूर झाली असून पहिल्या टप्प्यात सहा भागांत ती लागू केली आहे. त्यानुसार, या भागांचा




सर्व्हे सुरू आहे. मात्र, धोकादायक इमारतींचा प्रश्न हा आजही तसाच आहे. स्मार्ट सिटी म्हणून विकासाची स्वप्ने पाहणाऱ्या ठाणे शहरात विविध ठिकाणी एकूण चार हजार ६७० धोकादायक इमारती असून त्यात राहणाऱ्या लाखो नागरिकांपुढे सुरक्षित निवाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शासन आणि प्रशासनाच्या दप्तरदिरंगाईमुळे या धोकादायक इमारतींचा पुनर्विकास रखडल्याचा रहिवाशांचा आरोप आहे. या धोकादायक इमारतींपैकी सर्वाधिक दिवा आणि मुंब्र्यात आहेत. यामुळे तलावांचे ठाणे याऐवजी धोकादायक इमारतींचे ठाणे ही शहराची नवी ओळख ठरू लागली आहे.

महापालिका क्षेत्रात ७० टक्कयांहून अधिक अनधिकृत बांधकामे असून यात झोपडपट्टी विभागाचे मोठे प्रमाण आहे. गेल्या वर्षी या वस्त्यांच्या पुनर्विकासासाठी समूह विकास योजना मंजूर केली. मात्र, तिच्या अंमलबजावणीच्या अगदीच प्राथमिक टप्प्यात आहे. ती कधी पूर्ण होईल, याबाबत नागरिकांच्या मनात साशंकता आहे. दरवर्षी पावसाळ्यात या इमारतींमधील रहिवाशांची झोप उडते. त्यांच्या पुनर्विकासासाठी तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता होती. मात्र, तसे झाले नाही. या इमारतींमध्ये सुमारे एक लाखांहून अधिक रहिवासी वास्तव्यास आहेत. योग्यवेळी या इमारतींचा पुनर्विकास झाला असता, तर पालिकेला कोट्यवधीचे उत्पन्न मिळाले असते. शिवाय, शहरात किफायतशीर दरात घरे उपलब्ध झाली असती. मात्र, अशा परिस्थितीत नवीन ठाण्यातील गृहनिर्माण विकासावर परिणाम झाला असता. त्यामुळे पुनर्विकास योजनेकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे.

## तलासरीमधील ग्रीनपार्क रिसॉर्टवर पोलिसांची धाड

# ८ तरुणींसह ११ पुरुष ताब्यात

**पालघर -** गुजरात राज्याच्या सीमेवरील अच्छाड येथील ग्रीनपार्क रिसॉर्टमध्ये अवैधरित्या सुरू असलेल्या डान्स बारवर पोलिसांनी छापा टाकत ८ बारबाला व ११ पुरुषांना ताब्यात घेतले. तलासरी पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार ग्रीनपार्क रिसॉर्टमध्ये काही बारबाला व पुरुष उशिरापर्यंत संगीतावर अश्लील नृत्य व कृत्य करत पैसे उडवत असल्याची माहिती मिळाली होती. त्याआधारे पोलिसांनी सदर रिसॉर्टमध्ये बुधवारी रात्री धाड टाकून ८ तरुणी व ११ पुरुषांना ताब्यात घेतले.



ग्रीनपार्क रिसॉर्टमध्ये अवैधरित्या डान्सबार सुरु होते. या रिसॉर्टमधून पोलिसांनी ४८ हजार १५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून रिसॉर्ट व्यवस्थापक आयोजक निपम सुरेशभाई शाह रा. भिल्लाड तसेच हसन शबीर खान राहणार काशिमीरा यांच्यावर विनापरवाना गैरमार्गाने कार्यक्रम चालू ठेवला म्हणून गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तरुणी व पुरुषांवर भा.द.वि २९४, ११४, १०९, महा पो. अधिनियम कलम ३३ आर डब्लूयू १३१ प्रमाणे अटक करून कोर्टात हजर केले. गुजरात महाराष्ट्र सीमा असल्याने ग्रीनपार्क रिसॉर्टमध्ये गुजरात राज्यातील पर्यटक येत असतात. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून चोरी छुपे अवैधरित्या डान्सबार, पार्टी यांचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगण्यात येत असून अनेक गैरकृत्यही रिसॉर्ट मध्ये चालवले जात असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

# मोडक्या इमारतींमध्ये डिजिटल शाळा

**कल्याण-** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या ५७ शाळा आहे. या शाळा मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, तामिळ माध्यमाच्या आहेत. या शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठी व खाजगी इंग्रजी शाळेच्या तुलनेत मुलांच्या शिक्षणाच्या आधुनिकीकरणाकरिता महापालिकेने ३१ शाळा डिजिटल केल्या आहेत. महापालिका शाळेतील पटसंख्या वाढवण्यासाठी हा प्रयत्न केला जात आहे. अर्थात एकूण ५७ शाळांपैकी ३१ शाळेतील विद्यार्थी डिजिटल शिक्षणाच्या मार्गावर असले तरी उर्वरीत २६ शाळा डिजिटल झालेल्या नाही. त्यांचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत.

महापालिकेच्या शाळेत सर्वसामान्यांची मुले शिक्षण घेतात. ज्यांना खाजगी इंग्रजी शाळेतील शिक्षणाची फी परवडत नाही. त्यांची मुले महापालिकेच्या शाळेतून शिक्षण घेतात. सामान्यांचाही ओढा आजच्या काळात इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश घेण्याकडे जास्त आहे. गेल्या दहा वर्षातील महापालिका शाळांच्या विद्यार्थी संख्येवर नजर टाकली तर यापूर्वी महापालिकेच्या ७४ शाळा होत्या. त्यात ११ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत होते. शाळांची संख्या रोडावत गेली. आजच्या घडीला महापालिकेच्या केवळ ५७ शाळा सुरु असून त्यात ९ हजार ५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. डिजिटल स्क्रीनवर पाठ्यपुस्तकातील धडे, गणिते शिकवले जातात. विज्ञान विषयाशी संबंधित प्रयोग व आकाशगंगा निरीक्षण हे विषय शिकवले जातात. मुले डिजिटल होत असली तरी शाळेच्या इमारतीही सुस्थितीत असणे आवश्यक आहे. सर्वशिक्षा अभियानातून आलेल्या निधीतून महापालिका शाळांची देखभाल, दुरुस्ती करते. काही ठिकाणी दुमजली इमारती बांधून शाळा सुसज्ज करण्यात आलेल्या आहेत. ज्या गावांमध्ये अद्याप विकास झालेला नाही.

# वाहनचोरी थांबविण्याचे पोलिसांपुढे आव्हान


## पनवेल, उरणसह नवी मुंबईमध्ये वाहनचोरीचे प्रमाण वाढू लागले

**नवी मुंबई : पनवेल, उरणसह नवी मुंबईमध्ये वाहनचोरीचे प्रमाण खूपच वाढू लागले आहे. प्रतिदिन किमान दोन वाहने पळविली जात आहेत. पाच वर्षांमध्ये तब्बल ३३५३ वाहने चोरीला गेली असून, त्यापैकी फक्त १००१ गुन्ह्यांचा उलगडा झाला आहे.**

पोलीस आयुक्तालय क्षेत्रामध्ये चोरी, घरफोडीचे गुन्हे रोखण्याचे आव्हान पोलीस यंत्रणेसमोर उभे राहिले आहे. यामध्ये वाहनचोरीचा प्रकार अत्यंत गंभीर आहे. शहरामधील वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. वाहने उभी करण्यासाठी जागाच उपलब्ध होत नाही, यामुळे नागरिकांना रात्री जागा मिळेल तेथे वाहने उभी करावी लागत आहेत.

अवजड वाहनांसाठी ट्रक व बस टर्मिनलची संख्या अपुरी आहे. यामुळे मोकळ्या भूखंडावर व रोडच्या बाजूला वाहने उभी करावी लागतात. पार्किंगची ही समस्या चोरट्यांच्या पथ्यावर पडली आहे. आयुक्तालय क्षेत्रामध्ये वाहनचोरी करणाऱ्या अनेक टोळ्या सक्रिय झाल्या आहेत. दिवसा रेल्वे स्टेशन व इतर ठिकाणावरून वाहने पळविली जात आहेत. रात्री रहदारी नसलेल्या रोडवर उभी केलेली वाहने पळविली जात आहेत. पाच वर्षांमध्ये तब्बल ३३५३ वाहने चोरीला गेली आहेत. पूर्वी दुचाकी चोरीचे प्रमाण सर्वाधिक होते; परंतु आता कार व अवजड वाहनेही पळविली जात आहेत. पाच वर्षांमध्ये २८५ ट्रक, टेम्पो व इतर वाहने चोरीला गेली आहेत. ८१७ कार व तब्बल २२५१ दुचाकी पळविल्या आहेत. वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा होण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. २०१४ पासून फक्त १००१ गुन्ह्यांचा उलगडा झाला असून, अद्याप २३५२ वाहनांचा शोध घेण्यात अपयश आले आहे.

घरफोडी व इतर गुन्ह्यांच्या तुलनेमध्ये वाहनचोरी करणे अत्यंत सोपे आहे. रोडवर व पार्किंगमध्ये उभ्या केलेल्या वाहनांचे लॉक दोन मिनिटांमध्ये तोडून चोरटे वाहन घेऊन पळ काढतात. चोरी झाल्याचे निदर्शनास येईपर्यंत आयुक्तालयाच्या



कार्यक्षेत्राबाहेर पोहोचण्यात यश येत आहे. मुंबईच्या बाहेर गाडी गेली की, ती पुन्हा सापडण्याची शक्यता कमीच असते. यामुळे वाहनचोरी करणाऱ्या टोळ्या वाढत आहेत. पोलिसांनी वाहनचोरी थांबविण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत; परंतु त्यांना वाहनधारकांचे सहकार्य लाभत नाही. वाहनांमध्ये टेप व इतर उपकरणे बसविण्यावर हजारो रुपये खर्च करणारे नागरिक सुरक्षा उपकरण खरेदी करण्याचे टाळत आहेत. लाखो रुपयांची गाडी घेऊन त्याच्या सुरक्षेसाठी उपाययोजना केल्या जात नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास येत आहे. हे गुन्हे रोखण्यासाठी वाहनधारकांनीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

